| MHKO030026082013 | **स.फौजदारी खटला क्रमांक १४४१/२०१३**<br>**निशाणी क्रमांक ७७ खालील आदेश**<br><br>डॉ.प्रकाश गिरधरलाल केशवाणी – फिर्यादी<br>विरुध्द<br>चवगोंडा आण्णासो पाटील – आरोपी |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीतर्फे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ प्रमाणे जादा पुरावा देण्यास परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**फिर्यादीची विनंती थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. प्रस्तुत कामी न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीने फिर्यादीमध्ये दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे आरोपीच्या नावामध्ये दुरुस्ती केल्यामुळे फिर्यादीस जादा पुरावा देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. येणेप्रमाणे अर्ज असे.

३. आरोपीतर्फे प्रस्तुत अर्जास संधी देवून देखील त्यांनी म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविण्यात आला.

४. फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांना विस्तृतपणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३११ चे सरळ वाचन केले असता असे दिसून येते की, कोणतेही न्यायालय या संहितेखालील कोणतीही चौकशी, संपरिक्षा किंवा अन्य कार्यवाही कोणत्याही टप्प्यात असताना कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढू शकेल अथवा समक्ष हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून समन्स काढलेले नसले तरी तिची साक्ष तपासणी करु शकेल अथवा आधीच साक्ष तपासणी केलेल्या व्यक्तीला तर तो परत बोलावून तिची फेरतपासणी करु शकेल; आणि अशा कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी अत्यावश्यक आहे असे दिसून आले तर, न्यायालय तिला समन्स काढून तिची साक्षतपासणी करील किंवा पुन्हा बोलावून फेरतपासणी करील.

६. प्रस्तुत खटल्यातील विशिष्ट वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेता प्रस्तुत खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी फिर्यादीला जादा पुरावा देण्याची संधी फिर्यादीला देणे अत्यावश्यक आहे असे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण गुणावगुणांवर

निर्णित होणेस मदत होणार आहे. फिर्यादीतर्फे साक्षीदाराची साक्ष घेतल्यास आरोपी पक्षाच्या हितास कोणतीही बाधा पोहोचणार नसून फिर्यादीच्या प्रस्तुत शीघ्र न्यायाच्या हक्कास गती मिळणार आहे.  खटला न्यायपणे निर्णित करण्यास मदत होणार आहे. तसेच आरोपी पक्षास फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी असणार आहे. करिता मी खालीलप्रमाणे न्यायोचित आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२ फिर्यादीने रु.५००/- कॉस्ट मा.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांना देण्याच्या अटीवर फिर्यादीस जादा पुरावा देण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by PRAJAKTA BHIMRAO PATIL
Date: 2023.08.30 17:04:38 +0530

कोल्हापूर
दिनांक ३०/०८/२०२३

(श्रीमती पी. बी. पाटील)
५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोल्हापूर.